**<u>ठळक बातम्या</u>**

- राज्यातल्या विविध नगरपरिषद आणि नगरपंचायतींसाठी उद्या मतदान, आज रात्री १० वाजता प्रचार संपणार

- २४ नगर परिषद, नगर पंचायती आणि १५४ प्रभागातल्या निवडणुका पुढे ढकलल्यानं राजकीय पक्ष नाराज

- संसदेच्या हिवाळी अधिवेशनाला सुरुवात, विरोधकांच्या गदारोळामुळं कामकाजात अडथळे

**आणि**

- पाचवी आणि आठवीच्या शिष्यवृत्ती परीक्षेसाठी अर्ज भरायला ८ डिसेंबरपर्यंत मुदतवाढ

<><><><><>

राज्यातल्या २२२ नगरपरिषदा आणि नगरपंचायतींच्या निवडणुकीचा प्रचार आज रात्री १० वाजता संपेल. आज दिवसभर विविध पक्षांच्या नेत्यांनी प्रचाराचा धडाका लावला आहे. या *मतदानासाठी यंत्रणा सज्ज आहे. त्यासाठी* कर्मचारी आपापल्या मतदान केंद्रांवर पोहोचले आहेत. या निवडणुकीचं मतदान उद्या, तर मतमोजणी ३ डिसेंबर रोजी होणार आहे. या मतदानासाठी उद्या, २ डिसेंबर रोजी संबंधित ठिकाणी सार्वजनिक सुट्टी जाहीर झाली आहे.

दरम्यान, राज्यात एकंदर २४ नगरपरिषदा आणि नगरपंचायतींसाठी आणि १५४ सदस्यपदांसाठी येत्या २० डिसेंबर रोजी मतदान होणार आहे. न्यायालयात गेलेल्या प्रकरणांमध्ये अपील कालावधीनंतरच्या टप्प्यांसाठी सुधारित कार्यक्रमानुसार उमेदवारी अर्ज मागे घ्यायची मुदत १० डिसेंबर रोजी दुपारी ३ वाजेपर्यंत असेल. अंतिम उमेदवारांची यादी आणि निवडणूक चिन्हांचं वाटप ११ डिसेंबरला होईल. २० डिसेंबर रोजी मतदान, तर २१ डिसेंबर रोजी मतमोजणी होणार आहे. त्यात अंबरनाथ, कोपरगाव, बारामती, महाबळेश्वर, यवतमाळ, वाशिम यासह अनेक ठिकाणांचा समावेश आहे.

याला राजकीय पक्षांनी विरोध केला आहे. याविषयी अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून…

**- - होल्ड - कॅप्सूल - -**

*(**नाशिक** जिल्ह्यातल्या सिन्नर, ओझर आणि चांदवड नगरपरिषदांच्या निवडणुका पुढे ढकलायचा निर्णय निवडणूक आयोगानं घेतला आहे. **सांगली** जिल्ह्यातल्या शिराळा नगरपंचायत प्रभाग ४च्या सदस्यपदाची निवडणूक, निवडणूक आयोगानं स्थगित केली आहे.*

***सातारा** जिल्ह्यातल्या महाबळेश्वर आणि फलटण पालिकेची निवडणूक, तसंच मलकापूर पालिकेतल्या २ ठिकाणी न्यायालयाच्या निर्णयानुसार २० डिसेंबर रोजी मतदान होणार आहे.*

*सोलापूर जिल्ह्यात अनगर आणि मंगळवेढ्यासह जिल्ह्यातल्या काही प्रभागांमधल्या निवडणुकाही लांबणीवर पडल्या आहेत.*

***अकोला** जिल्ह्यातल्या अकोट तालुक्यातल्या प्रभाग ४ ची निवडणूक उमेदवाराचा मृत्यू झाल्यानं स्थगित करण्यात आली आहे.*

***पालघर** नगरपरिषदेतल्या प्रभाग '१- ब' आणि वाडा नगरपंचायतीतल्या प्रभाग १२ची निवडणूक स्थगित करण्यात आली आहे.*

***गडचिरोली**तल्या ३, तर आरमोरीत १, अशा एकंदर चार प्रभागांमधल्या निवडणुकांना आयोगानं स्थगिती दिली आहे.*

***हिंगोली** जिल्ह्यातल्या वसमत नगरपरिषदेची, तर हिंगोली नगरपरिषदेतल्या दोन प्रभागांच्या निवडणुकाही स्थगित झाल्या आहेत.*

*तर, यासह इतरही काही ठिकाणी निवडणूक कार्यक्रम स्थगित करायच्या राज्य निवडणूक आयोगाच्या निर्णयाला सर्वच राजकीय पक्षांनी विरोध केला आहे. निवडणुका स्थगित करायचा राज्य निवडणूक आयोगाचा हा निर्णय चुकीचा आहे, असं प्रतिपादन **मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस** यांनी आज छत्रपती संभाजीनगर इथं केलं. हा निर्णय इतर उमेदवारांवर अन्याय करणारा असून तो कायद्याला धरून नाही, असं ते म्हणाले.*

***होल्ड... बाईट- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस***

*निवडणूक प्रक्रिया स्थगित न करता सुरू ठेवाव्यात, अशी मागणी भाजपाचे प्रदेशाध्यक्ष **रवींद्र चव्हाण** यांनी राज्य निवडणूक आयुक्तांकडे पत्राद्वारे केली. **उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे** यांनीही हा निर्णय चुकीचा असल्याचं मत व्यक्त केलं. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष*

***हर्षवर्धन सपकाळ*** *यांनीही या निर्णयावर टीका केली. मतदान एका दिवसावर आलेलं असताना २० नगरपालिका आणि काही प्रभागांमधल्या निवडणुका पुढं ढकलायचा निर्णय आश्चर्यकारक आणि अनाकलनीय असून आयोगाचा भोंगळ कारभार सुरू आहे, असा आरोप सपकाळ यांनी केला.)*

**<><><><><>**

संसदेच्या हिवाळी अधिवेशनाला आजपासून सुरुवात झाली. विरोधी पक्ष सदस्यांनी मतदार यादी पुनरीक्षणासह विविध मुद्द्यांवर चर्चा करण्याची मागणी करत केलेल्या घोषणाबाजीमुळे लोकसभेचं कामकाज आधी दुपारी १२, नंतर दुपारी २ वाजेपर्यंत आणि अखेर दिवसभरासाठी तहकूब झालं.

लोकसभेत आज कामकाज सुरू झालं तेव्हा सभापती ओम बिर्ला यांनी दिवंगत अभिनेता धर्मेंद्र, निवृत्त कर्नल सोना राम चौधरी, प्राध्यापक विजय कुमार मल्होत्रा आणि रवी नाईक यांना श्रद्धांजली वाहिली. त्यानंतर प्रश्नोत्तराचा तास सुरू झाल्यावर विरोधी पक्ष सदस्यांनी मतदार यादी पुनरीक्षणासह विविध मुद्द्यांवर चर्चा करण्याची मागणी करत घोषणाबाजी सुरू केली. यावर बिर्ला यांनी नाराजी व्यक्त केली आणि कामकाज सुरू ठेवण्याचं आवाहन केलं. बिर्ला आवाहनानंतरही घोषणाबाजी सुरू राहिल्यामुळे सभापतींनी दुपारी १२ वाजेपर्यंत कामकाज तहकूब केलं. त्यानंतर सभागृहाचं कामकाज सुरू झालं तेव्हा अर्थमंत्री निर्मला सीतारमन यांनी मणिपूर वस्तू आणि सेवा कर सुधारणा विधेयक, केंद्रीय उत्पादन शुल्क सुधारणा विधेयक, आरोग्य सुरक्षा आणि राष्ट्रीय सुरक्षा उपकर विधेयक, २०२५ सादर सभागृहात सादर केली. मणिपूर वस्तू आणि सेवा कर सुधारणा विधेयक लोकसभेत आवाजी मतदानाने मंजूर करण्यात आलं. आदिवासी भागात पर्यटनाला चालना देण्यासाठी आणि ग्रामीण समुदायाच्या विकासासाठी प्रधानमंत्री जनजातिय उन्नत ग्राम अभियानांतर्गत १७ कोटी रुपयांहून अधिक निधी मंजूर करण्यात आल्याची माहिती पर्यटन आणि सांस्कृतिक मंत्री गजेंद्र सिंग शेखावत यांनी आज लोकसभेत एका प्रश्नाच्या लेखी उत्तरात दिली. विरोधी पक्षांची घोषणाबाजी सुरू राहिल्यामुळे कामकाज तहकूब करण्यात आलं.

**<><><><><>**

राज्यसभेत आज ११ वाजता कामकाजाला सुरुवात झाली. नॅशनल कॉन्फरन्सचे गुरविंदर सिंग ओबेरॉय, चौधरी मोहम्मद रमजान आणि सज्जाद अहमद किचलू यांनी वरिष्ठ सभागृहात सदस्य म्हणून शपथ घेतली. पहिल्यांदाच राज्यसभेचे अध्यक्षपद भूषवणारे अध्यक्ष सी.पी. राधाकृष्णन यांचं स्वागत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं. राधाकृष्णन यांचा उपराष्ट्रपतीपदापर्यंतचा प्रवास लोकशाहीची खरी ताकद दर्शवतो असं मोदी यावेळी म्हणाले. यावेळी बोलताना भारतीय लोकशाहीविषयी मोदी म्हणाले....

- **-होल्ड... बाईट - प्रधानमंत्री - -**

राज्यसभेतले विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे यांनी राधाकृष्णन हे निःपक्षपातीपणे वागणूक देतील, अशी आशा व्यक्त केली. त्यानंतर विरोधकांच्या घोषणाबाजीमुळे राज्यसभेचं कामकाजही २ वाजेपर्यंत तहकूब करण्यात आलं. तत्पूर्वी, अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी राज्यसभेत २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी अनुदानाची मागणी सादर केली. मतदार यादी पुनरीक्षणाच्या मुद्द्यावर विरोधी पक्ष सदस्यांनी चर्चेची मागणी केली. त्यावर उत्तर देताना संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी सरकार चर्चेसाठी तयार असल्याचं म्हटलं. मात्र, या उत्तराने समाधान न झाल्यामुळे विरोधकांना सभात्याग केला. त्यानंतर शून्य प्रहर, विशेष उल्लेख झाले आणि दिवसभराचं निर्धारित कामकाज झाल्यानंतर राज्यसभेचं कामकाज उद्यापर्यंत तहकूब झालं.

**<><><><><>**

देशभरातलं वस्तू आणि सेवा कर संकलन गेल्यावर्षी नोव्हेंबरच्या तुलनेने यंदा सात दशांश टक्क्यांनी वाढून १ लाख ७० हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त झालं आहे. गेल्या वर्षी याच महिन्यात जीएसटी महसूल १ कोटी ६९ लाख कोटी रुपये इतका होता. तर ऑक्टोबरमध्ये केंद्राचा जीएसटी महसूल ३४ हजार ८४३ कोटी आणि राज्याचा जीएसटी महसूल ४२ हजार ५२२ कोटी रुपये इतका जमा झाला होता.

**<><><><><>**

देशातल्या मनोरंजन आणि माध्यम जगात खूप क्षमता असून त्यांचा सुयोग्य वापर होण्याची गरज केंद्रीय माहिती आणि प्रसारण सचिव संजय जाजू यांनी आज व्यक्त केली. मुंबईत सीआयआय बिग पिक्चर समिटमध्ये ते बोलत होते. जागतिक बाजारपेठेत या क्षेत्रातली भारताची भागीदारी केवळ २ टक्के आहे. या संधीचा लाभ घ्यावा, असं आवाहन

त्यांनी उद्योगजगताला केलं. देशातल्या मनोरंजन उद्योगावर १ कोटीहून अधिक लोकं अवलंबून आहेत. AI आधारित गाणी आणि व्हिडीओ या क्षेत्रातली गणितं बदलत असताना आपणही नवनवीन तंत्रज्ञान आत्मसात करण्याची गरज आहे, असं ते म्हणाले.

**<><><><><>**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत येत्या २२ फेब्रुवारीला घेण्यात येणार असलेल्या पाचवी आणि आठवीच्या शिष्यवृत्ती परीक्षेचे ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी ८ डिसेंबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आल्याचं माहिती परीक्षा परिषदेनं कळवलं आहे. ज्या शाळांनी या परीक्षेचे ऑनलाईन अर्ज भरलेले नाहीत त्या शाळांनी ८ डिसेंबरपर्यंत नियमित शुल्कासह आवेदनपत्र तसंच शाळा माहिती प्रपत्र सादर करावीत असं आवाहन परीक्षा परिषदेनं केलं आहे. या मुदतीत आवेदनपत्र सादर न करू शकणाऱ्या शाळांना विलंब शुल्कासह १५ डिसेंबरपर्यंत, अतिविलंब शुल्कासह २३ डिसेंबरपर्यंत तर अति विशेष विलंब शुल्कासह ३१ डिसेंबरपर्यंत अर्ज भरता येतील, अशी माहिती परिषदेनं दिली आहे.

**<><><><><>**

येत्या दोन दिवसात कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात हवामान कोरडं राहण्याची शक्यता असून मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी थंडीची लाट येण्याची शक्यता आहे.

राज्यात यवतमाळमध्ये सर्वात कमी १०.८ अंश सेल्सियस तापमानाची नोंद करण्यात आली.

**//<><><><><>//**